# उपविभागीय अधिकारी(महसूल) कार्यालय कणकवली

**मार्गदर्शक -**

मा. अनिल पाटील (भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग

**संकलन व सादरीकरण**

श्री जगदीश कातकर
उपविभागीय अधिकारी

# 1. संकेतस्थळ (Website)

- सद्यस्थिती जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचे शासकीय संकेतस्थळवरून संकेतस्थळाचे कामकाज करणेत येत आहे. तसेच मोहीम कालावधीत या कार्यालयाची स्वतंत्र संकेतस्थळ कार्यन्वीत करण्यातआलेआहे. (**http://www.sdokankavli.com**)

- कणकवली उपविभागाशी संबंधित आवश्यक माहिती या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे

- जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग संकेत स्थळ - https://sindhudurg.nic.in


- लोकसेवा हक्क अधिनियम वरील संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेले आहेत.

# 2. सुकर जिवनमान ( Ease of Living)

## 1.एका दिवसात दाखले निर्गत करणे मोहीम .(one day clearance)

**वितरीत केलेल्या प्रमाणपत्राची माहिती.**

| तपशील | जात प्रमाणपत्र | नॉन क्रिमीलेअर | एकुण |
|---|---|---|---|
| 1 एप्रिल 2025 प्राप्त अर्जांची संख्या | 306 | 99 | 405 |
| 1 एप्रिल 2025 ते 30 एप्रिल पर्यंत प्रमाणपत्र निर्गमीत केलेली संख्या | 306 | 99 | 405 |
| एकुण अर्जांची संख्या | 306 | 99 | 405 |
| प्रलंबीत अर्जांची संख्या | 00 | 00 | 00 |




### जात, नॉनक्रिमिलेअर दाखल्यांसाठी आता 'वन डे क्लियरन्स' मोहीम

**कणकवली** : १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहीम अंतर्गत कणकवली उपविभागात जात व नॉनक्रिमिलेअर दाखल्यांबाबत वन डे क्लियरन्स मोहीम राबविण्यात येणार आहे. १ एप्रिल ते ३१ मे २०२५ या दोन महिन्यांच्या कालावधीकरिता राबविण्याच्या सूचना उपविभागीय अधिकारी जगदीश कातकर यांनी दिल्या आहेत. वन डे क्लियरन्स मोहीम राबविताना दाखल्याकरिता सेतू / महाई सेवा केंद्र यांच्याकडे अर्जप्रकरण सादर केल्यानंतर अर्जासोबत पुराव्यादाखल जोडलेले कागदपत्रे, महसुली पुरावे आदी बिनचूक असल्याची खात्री त्यांचे स्तरावर करुन योग्य पुरावे असलेली अर्जप्रकरणे एका दिवसात स्कॅन करुन अपलोड करुन सादर करायची आहेत. दुसऱ्या दिवशी तहसीलदार कार्यालय स्तरावर तिन्ही टेबलवरुन सदरची अर्जप्रकरणे बिनचूक तपासणी करुन उपविभागीय कार्यालयास सादर करून त्याच दिवशी सदरची अर्जप्रकरणे या कार्यालयाकडून निर्गती करावयाची आहेत. त्रुटी असलेली प्रकरणे या कार्यालयास सादर न करता ती त्याच दिवशी संबंधित सेतू/महाई सेवा केंद्र यांचेकडे पूर्ततेसाठी पाठवून देऊन संबंधितांकडून कागदपत्रांची पूर्तता करुन घ्यायची आहे. अपूर्ण असलेली अर्जप्रकरणे या कार्यालयाकडे सादर करु नयेत. आपले स्तरावर त्यांची पूर्तता करुन घ्यावयाची आहे. जूनमध्ये शैक्षणिक वर्षाची सुरुवात होत असल्याने शासनाने निर्देश दिल्याप्रमाणे वन डे क्लियरन्स मोहिमेचा अवलंब केल्यानंतर एप्रिल व मे महिन्यात मोठ्या प्रमाणात दाखल्यांची निर्गती होणे शक्य आहे.

जाती व नॉनक्रिमीलेयर दाखल्यासाठी अर्ज केलेल्या नागरिकाना त्वरित दाखले उपलब्ध होण्यासाठी कणकवली उपविभागीय कार्यालयामार्फत १ **एप्रिल ते ३१ मे २०२५** या कालावधीत 'एक दिवसात दाखला'.(one day clearance) ही विशेष मोहिम राबवण्यात येत आहे.या मोहिमे अंतर्गत माहे एप्रिल मध्ये ४०५ दाखले हे तात्काळ अर्ज केलेल्या दुसरया दिवशी नागरिकांना देण्यात आलेले आहेत.

## 2.भूसंपादन मेळावे.:







उपविभागीय अधिकारी कार्यालयामार्फत **भूसंपादन मेळावे** उपक्रम अंतर्गत संबंधित प्रकल्पग्रस्त गावांमध्ये थेट भेट देऊन **प्रकल्पग्रस्त नागरिकांना प्रकल्पबाधित दाखल्यांचे वाटप** करण्यात आले .सुमारे ७५ दाखले वाटप केले.

तसेच, **भूसंपादन मोबदला वाटपाच्या प्रक्रियेसाठी आवश्यक कागदपत्रे** गावातच **जमा** करून घेण्यात आले जेणेकरून नागरिकांना कार्यालयात वारंवार येण्याची गरज भासली नाही.(सुमारे १.२५ कोटी रुपये रक्कमेसाठीची कागद पत्रे जमा केली.)

या उपक्रमामुळे प्रकल्पग्रस्त नागरिकांना शासकीय सेवा अधिक **सुलभ, जलद आणि लोकाभिमुख** पद्धतीने मिळत आहेत. प्रशासन व नागरिक यांच्यातील विश्वास वाढवण्याच्या दृष्टीने हा उपक्रम प्रभावी ठरत आहे.

# 3. स्वच्छता

❑ **प्रत्यक्ष अभियान**

**1. अभिलेख निंदणीकरण व वर्गीकरण**
अ- 31, ब- 188, क- 421, क -1- 21 नस्तीं अभिलेख कक्षात पाठविण्यात आलेल्या आहेत.

**2. मुदतबाह्य अभिलेखे नष्ट केले**
ड - वर्गीय कागदपत्रांची संख्या 7125 एवढी असून 208 मुदतबाह्य अभिलेख नस्ती नष्ट केलेल्या आहेत.

**3.जड वस्तू संग्रह नोंदवही अद्यावतीकरण करून जुन्या व निरुपयोगी जड वस्तूंची विल्हेवाट-**फर्निचर व इतर साहित्य-10 संगणक - 1 जड वस्तुंची विल्हेवाट लावण्यात आली.





अभिलेख निंदणीकरण व वर्गीकरण



जुन्या निरुपयोगी वस्तूची विल्हेवाट



निंदणीकरना नंतरचे नष्ट अभिलेख
















- उपविभागातील अंतर्गत असलेल्या सर्व तलाठी, मंडळ अधिकारी, ग्रामपंचायत या कार्यालायामध्ये स्वच्छता करण्यात आली तसेच जुन्या व निरुपयोगी वस्तूंची विल्हेवाट करण्यात आली.

# 4. तक्रार निवारण.

❖ 1. आपले सरकार व पीजी पोर्टल वरती एकही तक्रार प्रलंबित नाही.

| तक्रारी प्रकार | प्राप्त तक्रारी | निकाली तक्रारी | प्रलंबित तक्रारी |
|---|---|---|---|
| आपले सरकार | 5 | 5 | 0 |
| PG Portal | 0 | 0 | 0 |






अभ्यागतांसाठी भेटीसाठी वेळा निश्चितिची माहिती उपविभागीय कार्यालय कणकवली येथे सोमवार ते शुक्रवार उपलब्ध्तेनुसार दर्शविण्यात आली आहे

## 2. लोकशाही दिन :

कणकवली उपविभागातील सर्व तालुक्यांमध्ये – म्हणजेच **कणकवली, देवगड आणि वैभववाडी** तालुक्यांत – **महिन्यातील तिसऱ्या सोमवारी 'लोकशाही दिन'** आयोजित केला जातो. या दिवशी नागरिकांना प्रशासनासमोर थेट आपली तक्रारी, अडचणी व निवेदने मांडता येतात. विविध विभागांच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत या तक्रारींचे निवारण करण्यासाठी तत्काळ उपाययोजना करण्यात येतात. लोकशाही दिन हा नागरिक-प्रशासन यामधील संवादाचा एक महत्त्वपूर्ण माध्यम आहे.

तालुका-कणकवली



# लोकशाही दिनी कार्यालय प्रमुखांची हजेरी बंधनकारक

प्रतिनिधी
कणकवली

महिन्याच्या प्रत्येक तिसऱ्या सोमवारी लोकशाही दिन असणार आहे. या लोकशाही दिनाला शासकीय कार्यालय प्रमुखांची उपस्थिती बंधनकारक राहील. ज्यांना लोकशाही दिनाला हजर राहता येणार नाही, त्यांनी जिल्हाधिकारी यांची परवानगी घ्यावी. लोकशाही दिनाला कार्यालयातील प्रतिनिधीला प्रवेश दिला जाणार नाही, असे प्रांताधिकारी जगदीश कातकर यांनी सांगितले. या लोकशाही दिनात महावितण संदर्भात एकमेव तक्रार प्राप्त झाली.

येथील तहसीलदार कार्यालयात तालुकास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी श्री. कातकर बोलत होते.

यावेळी तहसीलदार दीक्षांत देशपांडे, पंचायत समितीचे प्रशासकीय अधिकारी अनिल चव्हाण, सा. बां.च्या उपअभियंता श्रीमती के. के. प्रभू, सामाजिक वनीकरण विभागाचे तेजस चौगुले, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे अमित सावंत, बालविकास अधिकारी योगिता पई, शिक्षण विस्तार अधिकारी कैलास राऊत, कृषी अधिकारी स्वप्निल भादिरगे, भूमी अभिलेखचे सचिन खेडेकर आदी उपस्थित होते.

कणकवली : लोकशाही दिन बैठकीला उपस्थित जगदीश कातकर. दीक्षांत देशपांडे व अन्य.

या लोकशाही दिनामध्ये यावेळी सांगवे येथील प्रभाकर सावंत यांनी वीज वितरण कंपनीबाबत तक्रार केली. कृषी पंपाचे बिल चुकीच्या पद्धतीने येत आहे. आपण पैसे भरण्यास तयार आहोत. मात्र, वीज वितरणकडून वर्षभराचे एकच बिल पाठवले जात असल्याचे सांगितले. यावेळी तक्रारीबाबत महावितरणच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा करण्यात आली. तसेच, तक्रार लेखी स्वरूपात द्यावी. महावितरणकडून त्याबाबत आपणाला उत्तर देण्यात येईल, असे श्री. कातकर यांनी सांगितले.

तालुका-देवगड



# 5. कार्यालयीन सोई-सुविधा (Office Amenities)




कार्यालयात येणाऱ्या अभ्यागतांसाठी स्वच्छ आणि सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात आले आहे. यासाठी *वॉटर प्युरिफायर* बसविण्यात आलेला आहे.







पुरुष आणि महिलांसाठी स्वतंत्र व स्वच्छ प्रसाधनगृहांची सुविधा उपलब्ध आहे, जेणेकरून कोणत्याही गैरसोयीचा सामना करावा लागणार नाही.

## गार्डन





## गार्डन



उपविभागीय कार्यालयाच्या परिसरात एक आकर्षक बाग तयार करण्यात आली आहे. हे कार्यालयाच्या सौंदर्यवर्धनासाठी आणि कार्यक्षेत्राच्या वातावरणाला अधिक छान बनवण्यासाठी केले आहे. बागेमध्ये विविध प्रकारची रंगीबेरंगी फुलं,आणि झाडं आहेत, जे कार्यालयाच्या वातावरणाला ताजेपण देतात. तसेच, जुने उपविभागीय कार्यालय प्रवेशद्वारही नव्या रूपात सजवले गेले आहे, ज्यामुळे कार्यालयाच्या प्रतिमेला एक नवा दृष्टिकोन मिळाला आहे.



जुने कार्यालय प्रवेशद्वार




नवीन कार्यालय प्रवेशद्वार

"कार्यालयीन वातावरण अधिक अल्हादायक, प्रेरणादायक व कार्यक्षम राहावे यासाठी कार्यालयात आधुनिक सुविधा उपलब्ध करून देत आवश्यक बदल करण्यात आले असून, ते अद्ययावत स्वरूपात विकसित करण्यात आले आहे."




Before







AFTER




## 3.अभ्यागत कक्ष.





अभ्यागत यांच्यासाठी प्रतीक्षा कार्यालय याची स्वतंत्र व्यवस्था आहे.

## 4 दिशादर्शक फलक




अभ्यांगत भेटीसाठी वेळ निश्चित केलेला असून उपविभागीय अधिकारी त्यांच्या अनुपस्थितीत अन्य अधिकारी यांची नियुक्तीबाबतचे फलक दालनाबाहेर लावण्यात आलेले आहेत.

# 6.क्षेत्रीय कार्यालयांना भेटी (Visit to Regional Field Offices)-







## प्रांताधिकारी जगदीश कातकर यांची नवीन कुर्ली प्राथमिक शाळेस भेट

### नवीन कुर्ली प्राथमिक शाळेची प्रगती कौतुकास्पद - कातकर



**फोंडाघाट (वार्ताहर) :**

प्रांताधिकारी जगदिश कातकर यांनी शनिवारी नवीन कुर्ली प्राथमिक शाळेला भेट दिली. शाळेच्या वतीने मुख्याध्यापक जोशी यांनी पुष्पगुच्छ देऊन प्रांताधिकाऱ्यांचे स्वागत केले. तसेच शाळेतील सर्व वर्गांना भेट देऊन मुलांसोबत संवाद साधला. 'आय एम विनर' आणि 'सिंधू टॅलेंट सर्च' स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. स्पर्धा परीक्षेमध्ये शाळेतील मुलांनी केलेली उल्लेखनीय कामगिरी, शाळेचा आजूबाजूचा स्वच्छ परिसर पाहून शाळेतील शिक्षक आणि पालकांचे कौतुक व अभिनंदन केले. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अमित दळवी, शिक्षणप्रेमी राजेंद्र कोलते, प्रशांत दळवी, तांबे सर शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

प्रांताधिकारी जगदीश कातकर यांनी मोहीम कालावधीत उपविभागातील प्राथमिक शाळा,अंगणवाडी,तलाठी कार्यालय/ग्रामपंचायत कार्यालय यांना भेटी देऊन शाळेतील मुलांशी, शिक्षकांशी,तलाठी,ग्रामपंचायत सरपंच यांच्याशी सवांद साधला.

# ❖ तलाठी कार्यालयास भेट.



मा.उपविभागीय अधिकारी कणकवली यांनी मंडळ नांदगाव येथील नांदगाव सजाला भेट दिली त्यावेळी कार्यालयीन स्वच्छता, Agri stack, फेरफार नोंदी , वारस तपास मोहिम , दप्तर अद्ययावतीकरण शिल्लक वसुली याबाबत आढावा घेतला .यावेळी मंडळ अधिकारी व मंडळातील सर्व तलाठी ऊपस्थित होते.




मा.उपविभागीय अधिकारी कणकवली यांनी मंडळ फोंडाघाट येथे भेट दिली त्यावेळी कार्यालयीन स्वच्छता, Agri stack, फेरफार नोंदी, वारस तपास मोहिम,दप्तर अद्ययावतीकरण शिल्लक वसुली याबाबत आढावा घेतला.यावेळी मंडळ अधिकारी व मंडळातील सर्व तलाठी ऊपस्थित होते.

# 7. ई-ऑफिस प्रणाली (E-Office System):

## ❑ इ-ऑफिस प्रणालीतील कामकाजाची माहिती (दि. १ जानेवारी ते ३१ एप्रिल):

उपविभागीय कार्यालयांतर्गत इ-ऑफिस प्रणालीद्वारे कामकाज करण्यात येत आहे. दिनांक १ जानेवारी ते ३१ एप्रिल या कालावधीत एकूण ७४९ ई-फाईल्स तयार करण्यात आल्या आहेत.

सदर प्रणालीमध्ये ३ डेस्क कार्यरत असून, त्याद्वारे नियमितपणे कामकाज पार पाडले जाते.

## ❑ I-GOT कर्मयोगी पोर्टल प्रशिक्षण:

I-GOT कर्मयोगी पोर्टल अंतर्गत उपविभागीय कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी प्रशिक्षण पूर्ण केले आहे.

# ८. आर्थिक व औद्योगिक गुंतवणुकीस प्रोस्ताहन









कणकवली व देवगड तालुक्यांमध्ये उद्योजकांना उद्योग उभारणीसाठी आवश्यक मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळावे, यासाठी प्रशासनामार्फत विशेष बैठकांचे आयोजन करण्यात आले. नवउद्योजकांना उद्योग सुरू करण्याच्या अनुषगाने प्रशासन व उद्योजक यांच्यात थेट संवाद घडून आला.

# 9.अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी आणि कृत्रिम बुद्धीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI)




- उपविभागीय कार्यालय मधील ग्रामपंचायत कोकिसरे ता. वैभववाडी येथे जिवंत 7/12 मोहिमेबाबत महसूल व वन विभाग यांच्याकडील दिनांक 19/03/2025 रोजीच्या शासन निर्णयानुसार चावडी वाचन केले.तसेच जास्तीत जास्त खातेदारांना Agri stack अंतर्गत Farmer ID काढण्याचे आवाहन केले.



- उपविभागीय कार्यालय मधील कणकवली मधील ग्रामपंचायत फोंडा येथे Agri stack बाबत अंतर्गत प्रशिक्षण देण्यात आले तसेच Farmer ID काढण्याचे आवाहन करण्यात आले.



- सर्व कार्यालयप्रमुखांसोबत शासकीय कामकाजात **कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence – AI)** तंत्रज्ञानाचा वापर कसा करता येईल, यासंदर्भात प्रशिक्षण सत्र व सविस्तर चर्चा आयोजित करण्यात आली. या सत्रात विविध कार्यालयीन प्रक्रियांमध्ये AI चा कसा उपयोग करून कार्यक्षमतेत वाढ करता येईल, वेळ व संसाधनांची बचत कशी साधता येईल, यावर मार्गदर्शन करण्यात आले.

# 10. नाविन्यपुर्ण उपक्रम

## ❖ शाळा तेथे दाखले वाटप:



संपुर्ण कणकवली तालुक्यामध्ये शाळा तेथे दाखले ही मोहीम राबविण्यात येत आहे. त्या अनुशंगाने विविध शाळा, कॉलेज, हायस्कुल मधुन तसेच गांमपंचायत कार्यालयातुन विविध प्रकारचे दाखले वाटप करण्यात येत आहेत.



### तळेरेत 'शाळा तेथे दाखले' मोहिमेचा शुभारंभ

विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी कणकवली तहसील कार्यालयाचा उपक्रम

वार्ताहर
तळेरे

'शाळा तिथे दाखले' या उपक्रमांतर्गत तालुक्यातील सर्व शाळांमध्ये जाऊन अशा पद्धतीने दाखले वितरण मोहीम आम्ही राबविणार आहोत. शैक्षणिक वर्ष चालू होताना विद्यार्थ्यांना दाखल्यांसाठी धावपळ होऊ नये, यासाठी आम्ही हे प्रयत्न करत आहोत. याची सुरुवात या प्रशालेतून करण्यात येत असल्याचे प्रतिपादन कणकवली तहसीलदार दीक्षांत देशपांडे यांनी केले.

वामनराव महाडिक माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तळेरे येथे तहसीलदार कार्यालयाच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी 'शाळा तिथे दाखले' या उपक्रमांतर्गत शैक्षणिक क्षेत्रात उपयोगी असणारे विविध प्रकारचे दाखले यावेळी वितरित करण्यात आले.

यावेळी तहसीलदार दीक्षांत देशपांडे, तळेरे मंडळ अधिकारी संतोष नागावकर, तळेरे तलाठी प्रमोद कोळपकर, तळेरे पोलीस पाटील चंद्रकांत जाधव, औदुंबरनगर पोलीस पाटील श्रेया जंगले, कोतवाल श्री तांबे, कणकवली तहसील सेतू कार्यालयातील कर्मचारी, तळेरे उपसरपंच रिया चव्हाण, माजी उपसरपंच शैलेश सुर्वे, शाळा समिती सदस्य प्रवीण वरूणकर, संतोष जठार, नीलेश सोरप, प्राचार्य अविनाश मांजरेकर सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व इतर उपस्थित होते.

६० विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा लाभ घेतला. यामध्ये उत्पन्नाचा दाखला, नॉन क्रेमिलेयर दाखला, डोंगरी दाखला, वय अधिवास दाखला, राष्ट्रीयत्व दाखला, जात दाखला, रहिवासी दाखला या प्रकारच्या दाखल्यांचा समावेश होता. प्रातिनिधिक स्वरूपात यापैकी काही दाखल्यांचे वितरण यावेळी करण्यात आले.

आभार प्रा. सचिन शेटये यांनी मानले.

तळेरे : दाखले वितरण करताना दीक्षांत देशपांडे. सोबत प्रा. अविनाश मांजरेकर, रिया चव्हाण, संतोष नागावकर व अन्य.



लोकमत

मस्ट READ

### गावभेट कार्यक्रमात दाखल्यांचे वितरण

**शिडवणे येथे तहसीलदार कार्यालयाचा उपक्रम**

लोकमत न्यूज नेटवर्क

**तळेरे :** महाराष्ट्र शासन व कणकवली तहसीलदार कार्यालय यांच्या १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमेअंतर्गत शिडवणे ग्रामपंचायतीमध्ये गावभेट कार्यक्रम ग्रामस्थांच्या उपस्थितीत उत्साहात झाला. यावेळी आवश्यक दाखल्यांचे वितरण आणि महसूल विषयक शंकांचे निरसन करण्यात आले.

या कार्यक्रमात कणकवलीचे तहसीलदार दीक्षांत देशपांडे यांच्यासह पाटील, मंडळ अधिकारी बावलेकर, शिडवणेचे सरपंच रवींद्र शेट्ये, माजी वित्त व बांधकाम सभापती रवींद्र जठार आदी उपस्थित होते. यावेळी मंडळ अधिकारी बावलेकर यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागचा उद्देश स्पष्ट केला.

तहसीलदार दीक्षांत देशपांडे यांनी यावेळी उपस्थित नागरिकांच्या जमिनीविषयक विविध शंकांचे निरसन केले आणि आवश्यक दाखल्यांचे समारंभपूर्वक वितरण केले. नागरिकांनी विचारलेल्या काही समस्यांवर तहसीलदार आणि त्यांच्या टीमने तत्काळ तोडगा काढला. ज्यामुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले होते.

या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाल वारगावचे उपसरपंच नाना शेट्ये, तलाठ आमरसकर, पोलिस पाटील समी कुडतरकर, तंटामुक्ती अध्यक्ष अनि पांचाळ, शिडवणे उपसरपंच दिपव पाटणकर, कोनेवाडीचे मुख्याध्याप प्रशांत कुडतरकर, कृषी अधिकारी साग चव्हाण, शिडवणे ग्रामसेवक देवें नलावडे, ग्रामपंचायत सदस्य दयान कुडतरकर आणि लाभार्थी उपस्थित होत

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिडवणे १ शाळेचे मुख्याध्यापक प्रवी कुबल यांनी तर माजी वित्त बांधकाम सभापती रवीं जठार यांनी उपस्थितां आभार मानले. गावभे कार्यक्रमाची उत्तम तया केल्याबद्दल उपस्थि अधिकाऱ्यांनी शिडव ग्रामपंचायतीचे कौतुक केले.

शिडवणे येथील गावभेट कार्यक्रमात शिडवणे ग्रामपंचायतीच्यावतीने सरपंच रवींद्र शेट्ये यांनी तहसीलदार दीक्षांत देशपांडे यांचे स्वागत केले.

**१००** दिवसांची कार्यालयीन सुधारणा विशेष मोहीम.

Hello Sindhudurg
Page No. 3 Apr 18, 2025
Powered by: erelego.com

# ❖ जन्म मृत्यू नोंदीचे घरपोच वाटप - वैभववाडी






वैभववाडी तालुक्यामध्ये छत्रापती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान या मोहीम कालावधीत मोडी व मराठी लिपीत उपलब्ध असलेल्या जुन्या जन्म व मृत्यु नोंदींची नागरीकांच्या मागणीनुसार त्या त्या गावात शिबीरे घेवुन जन्म मृत्यु नोंदींचे दाखले उपलब्ध करून देण्यात आले. उपविभागीय अधिकारी श्री. जगदीश कातकर व वैभववाडी तहसीलदार श्री. सूर्यकांत पाटील यांच्या उपस्थितीत जन्म मृत्यू नोंदीचे घरपोच वाटप शिबीर वैभववाडी, आचीर्णे या गावात हा उपक्रम लोकांना त्यांच्या जन्म आणि मृत्यू नोंदी घरपोच मिळवण्यासाठी मदत करण्यासाठी आयोजित करण्यात आलेला होता. या शिबिरात ग्रामस्थांना आवश्यक नोंदी पुरवण्याची प्रक्रिया सुलभ करण्यात आली. नागरिकांना त्यांच्या घराच्या दाराशी जन्म आणि मृत्यू नोंदी मिळवता आल्यामुळे, त्यांना सरकारी सेवा मिळवण्यासाठी कार्यालयात जाऊन वेळ घालवण्याची आवश्यकता नाही. शिबीराच्या माध्यमातून सरकारी सेवांची लोकांपर्यंत पोहोच सुनिश्चित केली जात आहे.

# ❖ कातकरी समाज दाखले वाटप - देवगडः







देवगड तालुक्यातील कातकरी समाजातील नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ मिळावा यासाठी एक विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या कार्यक्रमात उपविभागीय अधिकारी मा.जगदीश कातकर व तहसीलदार श्री. रमेश पवार यांच्या हस्ते जातीचे दाखले, रहिवासी दाखले, उत्पन्न प्रमाणपत्रे इत्यादी महत्त्वाचे दस्तऐवज वितरित करण्यात आले. या उपक्रमामुळे कातकरी समाजातील नागरिकांना शासकीय सेवा व योजनांसाठी आवश्यक कागदपत्रे सहज उपलब्ध होण्यास मदत झाली. हा उपक्रम सामाजिक समावेश व प्रशासनाच्या लोकाभिमुखतेचे प्रतीक ठरला.



धन्यवाद